वरिष्ठ पुरुष गट संघ निवड शिबिराचे आयोजन राज्य कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि जिजामाता महाविद्यालय आयोजित ६९ व्या राज्य पुरुष गट संघ निवड शिबिराचे उद्घाटन राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग अभंग होते.



यावेळी बोलताना गाडे म्हणाले, जिल्ह्याचा संघ सांघिक भावनेने खेळल्यामुळेच राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये विजयी झाला होता आणि राज्यच्या कबड्डीच्या इतिहासात जिल्ह्याने प्रथमच विजय मिळवला. यामध्ये खेळाडूची संघभावना आणि चिकाटी या गोष्टीमुळे हे शक्य झाले. त्यामुळे जिल्ह्याच्या खेळाडूंचा विश्वास वाढला आहे.

या शिबिरासाठी ज्ञानेश्वर उद्योगसमूहाचे प्रमुख नरेंद्र घुले, माजी आ. चंद्रशेखर घुले, शिक्षणसंस्थेचे सर्व संचालक आदींनी सहकार्य केले. हे शिबीर १ ते १५ जुलैदरम्यान होणार आहे. या शिबिराचे मार्गदर्शक म्हणून राज्य कबड्डी असोसिएशनने एअर इंडियाचे प्रशांत चव्हाण यांची मुख्य मार्गदर्शक म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच संघ संघव्यवस्थापक म्हणून आयुब पठाण हे काम पाहत आहेत. या शिबिरातून १२ खेळाडूंचा संघ निवडला जाणार असून, २१ ते २५ जुलै या कालावधीत चरखी दादरी (हरयाना) येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी राज्याचे प्रतिनिधित्व हा संघ करेल.

पत्रकार सुनिल पंडित कुकाणा

भारतनामः
Monday - 04 Jul 2022 - Page 2

संघ भावना ठेवल्यास महाराष्ट्राच्या कबड्डी संघाचा विजय निश्चित- प्रा. शशिकांत गाडे



भारतनामः
नेवासा (मोहन गायकवाड)

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावरील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयात राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र संघाच्या निवड चाचणी शिबीराचा उद्घाटन समारंभ शनिवार दिनांक २ जुलै २०२२ रोजी पार पडला.

वरिष्ठ पुरुष गट संघ निवड शिबिराचे आयोजन महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई यांच्या सहकार्याने अहमदनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि जिजामाता शास्त्र कला महाविद्यालय ज्ञानेश्वर नगर आयोजित ६९ वे महाराष्ट्र राज्य पुरुष गट संघ निवड शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन चे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांच्या शुभहस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग हे होते . यावेळी बोलताना प्राध्यापक शशिकांत गाडी यांनी सांगितले नगर जिल्ह्याचा संघ सांघिक भावनेने खेळल्यामुळेच राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये विजयी झाला होता आणि महाराष्ट्राच्या कबड्डीच्या इतिहासात अहमदनगर जिल्ह्याने प्रथमच विजय मिळवला आहे. यामध्ये खेळाडूची संघ भावना आणि चिकाटी या दोन गोष्टीमुळे हे शक्य झाले त्यामुळे नगर जिल्ह्याच्या खेळाडूंचा विश्वास वाढला म्हणून मी राज्य कबड्डी असोसिएशनला शिबिर आयोजन करण्याची संधी आमच्या जिल्ह्याला द्या ही मागणी केली.

त्यांनी आमची मागणी मान्य केली त्यामुळे श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाला हे शिबिर आयोजन करण्याचा मान मिळाला आहे. या शिबिरासाठी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे प्रमुख माजी आमदार नरेंद्र घुले पाटील साहेब माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील साहेब कारखान्याचे उपाध्यक्ष मा.आमदार पांडुरंग अभंग साहेब व शिक्षण संस्थेचे सर्व संचालक मंडळ, या सर्वांचे हे शिबिर आयोजित केल्याबद्दल आभार मानले.भेंडा येथील मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र कला महाविद्यालयात राज्य कबड्डी असोसिएशन ने अशा प्रकारचे शिबिर भरण्याची संधी दिली आणि ते शिबिर आम्ही यशस्वी करू , तुम्ही सर्व खेळाडूंनी एकजुटीने सराव करून खेळून महाराष्ट्राचा कबड्डी संघ नक्कीच विजय होईल अशा शुभेच्छा माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी अध्यक्षपदावरून बोलताना दिल्या.

यावेळी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे जिजामाता महाविद्यालयाचा विद्यार्थी श्री शंकर गदई यास महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन यांच्याकडून दिला जाणारा या वर्षाचा महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्याचाही सत्कार प्रमुख पाहुण्याच्या हस्ते झाला. भेंडा येथील रणवीर क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सोपान महापूर, बंडू भागवत, परसराम नाकाडे, सोपान काळे, संतोष औताडे (पत्रकार) त्याचबरोबर मंडळाचे सर्व सदस्य हे शिबिर यशस्वी करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे.

पुढारी

'कॉलेज की टीम लेके आया है क्या' हरियाणामध्ये हिणवले

पण खेळाडूंनी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेतील उपविजेतेपद खेचून आणले : प्रशिक्षक प्रशांत चव्हाण

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

हरियाणा येथे झालेल्या ६९व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राने नवोदित खेळाडूंना संधी देताना उपविजेतेपद खेचून आणले. मात्र, एकूण अनुभव केवळ होता. नवोदित खेळाडू पाहता 'कॉलेज की टीम लेके आया है क्या', असे हिणवण्यात आले. मात्र, कबड्डीपटूंनी माझा विश्वास सार्थ ठरवला, असे महाराष्ट्र पुरुष कबड्डी संघाचे प्रशिक्षक प्रशांत चव्हाण यांनी सांगितले.

अनुभवी खेळाडूंचा अधिकाधिक समावेश पाहता कमी संघ घेऊन चाललोत, अशी चर्चा हरियाणाला रवाना होण्यापूर्वी महाराष्ट्रातही सुरू होती. सर्वांच्या टिकाकारांही आमची पट्टा ठरवण्यात आली. 'कॉलेजचा संघ आपला का,' असे बोलले जात होते. आमचा संघ बाद फेरीही पार करणार नाही, असे सर्वांना वाटत होते. मात्र, मला माझ्या खेळाडूंवर विश्वास होता. त्यांनी माझा विश्वास सार्थ ठरवला. कमाचे श्रेय सर्व खेळाडूंना जाते. नवोदित खेळाडूंचा संघ घेऊन गेलो आणि उपविजेतेपद मिळवले, याचा अभिमान वाटतो, असे चव्हाण पुढे म्हणाले.

सांघिक कामगिरी उंचावण्यात खेळाडूंच्या मानसिकतेचा महत्त्वाचा वाटा होता. आम्ही फिटनेसला अधिक महत्त्व दिले, असे प्रशांत यांनी यावेळी अधोरेखित केले. राष्ट्रीय स्पर्धेच्या निवडचाचणीमध्ये २८ जणांचा समावेश होता. त्यातून १२ खेळाडूंची निवड करण्यात आली. महाराष्ट्र संघाने साखळी सिवेत १५ दिवसांचे होते. यात तंदुरुस्ती राखण्यावर भर होता. त्याचा सकारात्मक परिणाम असा दिसून आला की, संपूर्ण स्पर्धेत आमचा एकही खेळाडू चकलेला दिसला नाही. प्रत्येक खेळाडूने फिटनेस राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यामुळे आम्हाला अंतिम फेरीत पराक्रम मारले यांचे गेले, असे ते म्हणाले.

किमान सात खेळाडू

● राष्ट्रीय स्पर्धेतील उंचावलेल्या कामगिरीचा फायदा सर्वच खेळाडूंना होईल. अलसमसह मयूर आणि आकाश शिंदे हे प्रो-कबड्डी लीगमध्ये खेळलाहेत. मात्र, आगामी किमान सात खेळाडूंना लीगचे दरवाजे खुले होतील, असा विश्वास प्रशिक्षक प्रशांत चव्हाण यांनी व्यक्त केला.

कटवर साखळीसह सहा सामने खेळताना पाच सामने जिंकले तरी आव्हान शिल्लक राहते, असे चव्हाण यांनी सांगितले. स्पर्धेतील सर्व प्रतिस्पर्धी तगडे होते. मात्र, साखळीमध्ये मिळालेल्या आत्मविश्वासाचा बाद फेरीत फेकल, पंजाब आणि हरयाणा संघांनाही हरवण्यात आम्हाला यश आले. यजमान हरयाणा संघातील बहुतांशी खेळाडू प्रो-कबड्डी लीगमध्ये खेळलेले होते. महाराष्ट्र संघात अलसम इस्लामदार आणि मयूर कदम हेच अनुभवी होते. अन्य खेळाडूंनी एकमेकांही प्रो-कबड्डी दूरच, राष्ट्रीय स्पर्धाही खेळलेली नाही. मात्र, आमच्या खेळाडूंमध्ये आत्मविश्वास ठासून भरलेला होता.

सांघिक कामगिरी उंचावण्यात सपोर्टस्टाफ तसेच महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचे मोठे योगदान आहे, असेही प्रशांत यांनी पुढे सांगितले. व्यवस्थापक आदुब पठाण यांच्यासह फिजिओ ट्रेनर पुरुषोत्तम प्रभू, राज्य कबड्डी असोसिएशनचे सचिव आनंद पाटील तसेच सीईओ सचिन भोसले यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. प्रत्येक सामन्यापूर्वी आम्ही प्रतिस्पर्धी संघांचे बलस्थान तसेच कमकुवत बाजूंचा बारकाईने अभ्यास करायचो. त्या संघांचे पूर्वीचे सामने पु-टयूबवर पाहायचो. त्याप्रमाणे डावपेच आखले जात होते, असे चव्हाण यांनी म्हटले.

राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरीचा आढावा घ्यायचा झाल्यास आक्रमण ही जमेची बाजू ठरली. प्रकाश चव्हाण हे आमचे बलस्थान होते. आमचे चढाईपटू जीव तोडून खेळले. त्यामुळे मिळालेले गुण टिकून तेवा. ४० मिनिटांमध्ये एकही पकड झाली नाही सी खालेल, पण प्रतिस्पर्धी संघाला गुण बहाल करू नका, असे बचावकळीला कबाबल्याचे प्रशांत यांनी सांगितले.

Mumbai Edition
Jul 28, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

पुढारी

नेवाशाच्या शिरपेचात मानाचा तुरा

महाराष्ट्र कबड्डी संघाला उपविजेतेपद; कर्णधार शंकर गदईचा सत्कार

नेवासा : पुढारी वृत्तसेवा

हरियाणातील चरखी येथे दि.२१ ते २४ जुलै दरम्यान झालेल्या ६९ व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने उपविजेतेपद मिळविले. या संघाचा कर्णधार भेंडा (ता.नेवासा) येथील जिजामाता विद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदई याचा नेवासा येथे सत्कार करण्यात आला.

राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पहिल्यांदाच विजेतेपद मिळविणाऱ्या अहमदनगर संघाचे नेतृत्व करणाऱ्या शंकर गदईची पहिल्याच वर्षी महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. शंकर गदई व टिमने राष्ट्रीय स्पर्धेत उपविजेतेपद मिळविल्याने खेळाडूंचा बुधवारी (दि.२७) सत्कार करण्यात आला. यावेळी नेवाशाचे पोलिस निरीक्षक विजय करे, ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक काकासाहेब शिंदे, संभाजी पवार, राजेंद्र वाघमारे, शंकर नाबदे, मुकिंदपूरचे सरपंच सतीश निपुंगे, प्रा.बी.जे.टेमक, प्रा.रामकृष्ण माकोणे, प्रा.अशोक एरंडे, ॲड. वैभव वाकचौरे, ॲड.प्रशांत माकोणे, ॲड.प्रदीप वाखुरे, सुहास टेमक, राहुल सूर्यवंशी, विवेक नन्नवरे आदी उपस्थित होते.



नेवासा : शंकर गदई व राहुल खाटीक यांचा सत्कार करताना पोलिस निरीक्षक विजय करे, काकासाहेब शिंदे आदी.(छाया : कैलास शिंदे)

यावेळी पोलिस निरीक्षक करे म्हणाले, राज्य कबड्डी संघाचे नेतृत्व ग्रामीण भागातील शंकर गदई व राहुल खाटीक या दोन खेळाडूंनी केल्याचा सार्थ अभिमान संपूर्ण तालुकावासियांना आहे. सत्काराला उत्तर देताना कर्णधार शंकर गदई म्हणाला, आमचा संघ हा ग्रामीण भागातील असल्याने, प्रत्येक संघ आम्हाला हरविण्याच्या अविर्भावात वागत होता. मात्र, आमचे ध्येय फायनलचे न ठेवता आलेल्या प्रत्येक संघाला चितपट करण्याचे ठरवून आम्ही यशस्वी लढा दिला. ग्रामीण भागातील खेळाडूही कमी नसतात हे दाखवून दिले. पुढील वेळी महाराष्ट्राला नक्कीच विजयश्री खेचून आणू, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. प्रा.दत्तात्रय वाकचौरे यांनी संघाची विशेष देखभाल व काळजी घेतल्याचे गदई व खाटीक यांनी सांगितले.

My Ahmednagar Edition
Jul 29, 2022 Page No. 4

पुढच्यावेळी महाराष्ट्राला 'विजयश्री' खेचून आणणार - कर्णधार शंकर गदई

नेवाशाच्या शिरपेचात संघाने रोवला मानाचा तुरा.. पो.नि.विजय करे यांचे गौरवोद्गार

भारतनामा
नेवासा (मोहन गायकवाड)

चरखी (हरियाणा) येथे (दि.२१ ते २४) जुलै दरम्यान ६९ व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाला उपविजेतेपद मिळालेले आहे या संघाचे कर्णधार नुकत्याच झालेल्या स्पर्धा संपवून आले असता नेवासा येथे सत्कार आयोजित करण्यात आला. राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पहिल्यांदाच विजेतेपद मिळविणाऱ्या अहमदनगर संघाचे नेतृत्व करणाऱ्या भेंडे (ता. नेवासा) जिजामाता विद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदईची पहिल्याच वर्षी महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली शंकर गदई व टिमने उपविजेते पद मिळविल्याने खेळाडूंचा सत्कार बुधवार (दि.२७) रोजी नेवासा येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नेवासा तहसिलदार रुपेशकुमार सुराणा,पोलिस निरिक्षक विजय करे, जेष्ठनेते संभाजी (काका) पवार, पत्रकार राजेंद्र वाघमारे, शंकर नाबदे, मुकिंदपूरचे सरपंच सतिश निपुंगे, प्रा.बी.जे.टेमक, प्रा.रामकृष्ण माकोणे, प्रा.अशोक एरंडे, अँड वैभव वाकचौरे, अँड. प्रशांत माकोणे,अँड.प्रदिप वाखुरे,मुहाम टेमक,राहुल सुर्यवंशी,विवेक नऱ्हरे,नगरसेवक जितेंद्र कुऱ्हे आदी

प्रा.दत्तात्रय वाकचौरे यांनी संघाची विशेष देखभाल व काळजी घेतल्याने आम्हा खेळाडूंना मोठी उर्जा मिळाल्याचे यावेळी कर्णधार शंकर गदई व राहुल खाटीक यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

मान्यवर यावेळी उपस्थित होते.यावेळी बोलतांना पोलिस निरिक्षक करे म्हणाले की,राज्य कबड्डी संघाचे नेतृत्व ग्रामिण भागातील शंकर गदई व राहुल खाटीक या दोन खेळाडूंनी केल्याचा सार्थ अभिमान संपूर्ण तालुकावासियांना असल्याचे गौरोद्गारही यावेळी काढले व त्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक केले.

यावेळी सत्कारला उत्तर देतांना कर्णधार



शंकर गदई यावेळी म्हणाला की,आमचा संघ हा ग्रामिण भागातील असल्यामुळे जो,तो संघ आम्हाला हरविण्याच्या अविर्भावात वागत होतो माञ आमचे ध्येय अंतिम फायनलचे न ठेवता आलेल्या संधाला चितपट करण्याचे ठरवून आम्ही यशस्वी लढा दिला आणि ग्रामिण भागातील खेळाडूही काही कमी नसतात हे दाखवून दिले पुढच्या वेळी महाराष्ट्राला नक्कीच विजयश्री खेचून आणू असा आशावादही यावेळी कर्णधार शंकर गदई व राहुल खाटीक यांनी यावेळी सांगितले.

राष्ट्रीय कबड्डी उपविजेत्या संघातील भेंड्याच्या खेळाडूंचा आ. गडाखांनी केला सत्कार



भेंडा (वार्ताहर)– हरियाणा येथे झालेल्या ६९ व्या पुरूष वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशिप स्पर्धेतील उपविजेता महाराष्ट्र संघातील भेंडा येथील शंकर भीमराज गदाई व राहुल आबासाहेब खाटिक या खेळाडूंचा माजी मंत्री आ. शंकरराव गडाख यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र संघाचा कर्णधार शंकर गदाई व खेळाडू राहुल खाटीक यांचे दि.२७ रोजी भेंडा येथे आगमन झाले. त्यांची फटाक्याच्या आतषबाजीत बसस्थानक चौक ते नागेबाबा मंदिर व भेंडा खुर्द गावापर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. नागेबाबा मंदिरात माजी जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी या दोन्ही खेळाडूंचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रा. दत्ता वाकचौरे, गणेशराव गव्हाणे, डॉ. शिवाजीराव शिंदे, रवींद्र नवले, सुखदेव फुलारी, बाळासाहेब नवले, भाऊसाहेब गदाई, सोपान महापूर, राजेंद्र वाघडकर, बाबा गव्हाणे, रघू मोरकर आदी उपस्थीत होते.



भेंडा : राष्ट्रीय कबड्डी उपविजेते खेळाडू शंकर गदाई व राहुल खाटिक यांचा सत्कार करताना आमदार शंकरराव गडाख, प्रा. दत्ता वाकचौरे, सुखदेव फुलारी आदी.

खेळाडूंचा गडाखांच्या हस्ते सत्कार

भेंडा : हरियाणा येथे आयोजिलेल्या राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशीप स्पर्धे तील उपविजेता महाराष्ट्र संघ ठरला. या संघात भेंडा येथील शंकर भीमराज गदाई व राहुल आबासाहेब खाटिक या खेळाडूंचा आमदार शंकरराव गडाख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र संघाचा कर्णधार शंकर गदाई व खेळाडू राहुल खाटिक यांचे बुधवारी (दि.२७) भेंडा येथे आगमन झाले. त्यांचे आतषबाजी करून स्वागत करण्यात आले. यावेळी बसस्थानक चौक ते नागेबाबा मंदिर, भेंडा खुर्द गावापर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. नागेबाबा मंदिरात आमदार गडाख यांनी या दोन्ही खेळाडूंचा सत्कार केला. यावेळी प्रा. दत्ता वाकचौरे, डॉ. शिवाजीराव शिंदे, रवींद्र नवले, सुखदेव फुलारी, बाळासाहेब नवले, भाऊसाहेब गदाई, सोपान महापूर, राजेंद्र वाघडकर, बाबा गव्हाणे, रघू मोरकर आदी उपस्थित होते.

पुढच्यावेळी महाराष्ट्राला 'विजयश्री' खेचून आणणार–कर्णधार–शंकर गदई

नेवाशाच्या शिरपेचात संघाने रोवला मानाचा तुरा.. पो.नि.विजय करे यांचे गौरोद्गार

नेवासा येथे सत्कार समारंभात गदईचे प्रतिपादन...

मोहन गायकवाड / नेवासा (तालुका प्रतिनिधी) –चरखी (हरियाणा) येथे (दि.२१ ते २४) जुलै दरम्यान ६९ व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाला उपविजेतेपद मिळालेले आहे या संघाचे कर्णधार नुकत्याच झालेल्या स्पर्धा संपवून आले असता नेवासा येथे सत्कार आयोजित करण्यात आला.

राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पहिल्यांदाच विजेतेपद मिळविणाऱ्या अहमदनगर संघाचे नेतृत्व करणाऱ्या भेंडे (ता.नेवासा) जिजामाता विद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदईची पहिल्याच वर्षी महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली शंकर गदई व टिमने उपविजेते पद मिळविल्याने खेळाडूंचा सत्कार बुधवार (दि.२७) रोजी नेवासा येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नेवासा तहसिलदार रुपेशकुमार सुराणा,पोलिस निरिक्षक विजय करे,जेष्ठनेते संभाजी (काका) पवार,पत्रकार राजेंद्र बाधमारे,शंकर नाबदे,मुकिंदपूरचे सरपंच सतिश निपुंगे,प्रा.बी. जे.टेमक,प्रा.रामकृष्ण माकोणे,प्रा.अशोक एरंडे,ॲड वैभव वाकचौरे,ॲड.प्रशांत माकोणे,ॲड.प्रदिप वाखुरे,सुहास टेमक,राहूल सुर्ववंशी,विवेक नऱ्हरे,नगरसेवक जितेंद्र कुऱ्हे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.यावेळी

> प्रा.दत्तात्रय वाकचौरे यांनी संघाची विशेष देखभाल व काळजी घेतल्याने आम्हा खेळाडूंना मोठी उर्जा मिळाल्याचे यावेळी कर्णधार शंकर गदई व राहूल खाटीक यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

बोलतांना पोलिस निरिक्षक करे म्हणाले की,राज्य कबड्डी संघाचे नेतृत्व ग्रामिण भागातील शंकर गदई व राहूल खाटीक या दोन खेळाडूंनी केल्याचा सार्थ अभिमान संपुर्ण तालुकावासियांना असल्याचे गौरोद्गारही यावेळी काढले व त्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक केले.

यावेळी सत्काराला उत्तर देतांना कर्णधार शंकर गदई यावेळी म्हणाला की,आमचा संघ हा ग्रामिण भागातील असल्यामुळे जो,तो



संघ आम्हाला हरविण्याच्या अविर्भावात वागत होतो मात्र आमचे ध्येय अंतिम फायनलचे न ठेवता आलेल्या संधाला चितपट करण्याचे ठरवून आम्ही यशस्वी लढा दिला आणि ग्रामिण भागातील खेळाडूही काही कमी नसतात हे दाखवून दिले पुढच्या वेळी महाराष्ट्राला नक्कीच विजयश्री खेचून आणू असा आशावादही यावेळी कर्णधार शंकर गदई व राहूल खाटीक यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्राच्या पुरुष संघाला उपविजेतेपद



हरियाणा : येथे झालेल्या ६९ व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत झुंजार खेळ करुन महाराष्ट्राच्या पुरुष संघाला उपविजेतेपद मिळाले. सर्व खेळाडुंचे मुंबई येथे आगमन झाल्यावर विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या निवासस्थानी खेळाडुंचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

यावेळी अजित पवार यांनी खेळाडुंना शुभेच्छा देताना म्हणाले की महाराष्ट्राच्या कबड्डी खेळाला समृध्द वारसा,गौरवशाली परंपरा आहे. ही गौरवशाली परंपरा पुढे नेण्याचे काम राज्यातल्या आजी-माजी कबड्डी खेळाडुंनी,क्रीडा कार्यकर्त्यांनी निष्ठेने केले आहे , महाराष्ट्राच्या मातीतील या रांगड्या खेळाला आणखी उंचीवर नेण्यासाठी आपन सर्वांनी एकत्रित प्रयत्न करुया. सर्व खेळाडु,प्रशिक्षक व व्यवस्थापक याना बाबुराव चांदेरे सोशल फाऊंडेशन तर्फे अजित पवार यांच्या शुभहस्ते घड्याळ भेट देण्यात आले. याप्रसंगी आमदार भाई जगताप, सरकार्यवाहक - आस्वाद पाटील, बाबुराव चांदेरे ,सचिन भोसले,जे.जे.पाटील, रविंद्र देसाई,अविनाश सोलवट, दत्तात्रय झिंजुर्डे आदि मान्यवर उपस्थित होते.

सुनील छेत्री

'कबड्डीपटूंच्या नोकऱ्यांसाठी प्रयत्न करू'

उपविजेत्या महाराष्ट्र कबड्डी संघाचे मुंबईत जोरदार स्वागत

देहूरोड : राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पाच टक्के आरक्षणाच्या माध्यमातून नोकरी देण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन राज्याचे विरोधी पक्षनेते व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी बुधवारी दिले.

हरियाणातील चरखी-दादरी येथे झालेल्या ६९ व्या वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राला उपविजेतेपद मिळवून देणाऱ्या पुरुषांच्या कबड्डी संघाच्या खेळाडूंचे अजित पवार यांच्या मुंबईतील निवासस्थानी जोरदार स्वागत झाले. सर्व खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांना बाबूराव चांदेरे सोशल फाऊंडेशनतर्फे अजित पवार यांच्या हस्ते घड्याळ भेट देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष भाई जगताप, सरकार्यवाह ॲड.



आस्वाद पाटील, सदस्य बाबूराव चांदेरे, संयुक्त कार्यवाह रवींद्र देसाई, पंच मंडळाचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच दत्ता झिंजुर्डे, राष्ट्रीय खेळाडू संजय भोकल, जे. जे. पाटील, मुख्याधिकारी सचिन घोसले, अभिनव सोलन्कट आदी मान्यवर उपस्थित होते.

अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या संघाला जेतेपदासाठी रेल्वे संघाशी झुंज द्यावी लागली होती. मात्र, महाराष्ट्र संघाला २१-३८ अशा गुणफरकाने पराभव पत्करावा लागला होता. या सामन्यात प्रमुख्याने आकाश शिंदे व अस्लम इनामदार यांनी चमकदार कामगिरी केली आणि त्यांना साजेशी साथ संघाचा कर्णधार शंकर गदई व किरण मगर यांनी दिली. शिवाय, महाराष्ट्राच्या संघाने उपांत्य फेरीच्या सामन्यात बलाढ्य असा यजमान हरियाणा संघाला नामोहरम करीत कबड्डीप्रेमकांची मने जिंकली होती.

PRABHAAT | Press Registration No. 1639/1957, Year 91, Issue No. : 207

प्रभात

प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे.

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net

पुढच्या वेळी 'विजयश्री' खेचून आणणार : कर्णधार शंकर गदई



नेवासा, दि. २७ (प्रतिनिधी) - स्पर्धेत आमचे ध्येय अंतिम फायनलचे न ठेवता आलेल्या संघाला चितपट करण्याचे ठरवून आम्ही यशस्वी लढा दिला आणि ग्रामीण भागातील खेळाडूही काही कमी नसतात हे दाखवून दिले. पुढील वेळी महाराष्ट्राला नक्कीच विजयश्री खेचून आणू, असा आशावाद कर्णधार शंकर गदई व राहुल खाटिक यांनी व्यक्त केला.

चरखी (हरियाणा) येथे दि. २१ ते २४ जुलैदरम्यान आयोजित ६९व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाला उपविजेतेपद मिळाले. संघाचे नेतृत्व करणाऱ्या भेंडे (ता. नेवासा) जिजामाता विद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदईची पहिल्याच वर्षी महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. गदई व टिमने उपविजेतेपद मिळविल्याने खेळाडूंचा आज (बुधवार) नेवासा येथे सत्कार करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलिस निरीक्षक विजय करे, संभाजी पवार, पत्रकार राजेंद्र वाघमारे, शंकर नाबदे, सतीश निपुंगे, प्रा. बी. जे. टेमक, प्रा. रामकृष्ण माकोणे, प्रा. अशोक एरंडे आदी उपस्थित होते.

या वेळी निरीक्षक करे यांनी राज्य कबड्डी संघाचे नेतृत्व ग्रामीण भागातील शंकर गदई व राहुल खाटिक या दोन खेळाडूंनी केल्याचा सार्थ अभिमान तालुकावासीयांना असल्याचे गौरवोद्गार या वेळी काढले.

कर्णधार गदई म्हणाला की, आमचा संघ हा ग्रामीण भागातील असल्यामुळे जो तो संघ आम्हाला हरविण्याच्या अविर्भावात वागत होता. मात्र, आम्ही यशस्वी लढा दिला. प्रा. दत्तात्रय वाकचौरे यांनी संघाची विशेष देखभाल व काळजी घेतल्याने खेळाडूंना मोठी ऊर्जा मिळाल्याचे या वेळी गदई व खाटिक यांनी सांगितले.

पुण्य नगरी

भेंडयात राष्ट्रीय कबड्डी स्पर्धच्या उपविजेता खेळाडूंचा सत्कार

भेंडा : ६१ व्या पुरूषाच्या वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पीयन स्पर्धा चरखी, दादरी (हरियाणा) येथे नुकत्याच पार पडल्या. त्यात म्हाराष्ट्र संघ व भारतीय रेल्वे संघ यांच्यात लढत होऊन भारतीय रेल्वे संघाने विजेते पद पटकावले असून महाराष्ट्रच्या संघाला उपविजेते पद मिळाले आहे. त्यात महाराष्ट्र संघाचे कर्णधार येथील श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता महाविद्यालयाचा खेळाडू शंकर भिमराज गदाई व राहुल आबासाहेब खाटिक यांचा समावेश होता. त्यांचे नुकतेच भेंडयात आगमन झाले. त्यावेळी त्यांचे फटाक्याच्या आतषबाजीत जल्लोषात स्वागत करून भेंडा बुद्रुक बसस्थानक चौक ते नागेबाबा मंदिर, भेंडा खुर्द पर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती.



भेंडा बुद्रुक : येथील नागेबाबा मंदिरामध्ये राष्ट्रीय कबड्डी उपविजेते खेळाडु शंकर गदाई व राहुल खाटिक यांचा सत्कार करतांना माजी जलसंपदा मंत्री शंकरराव गडाख, प्रा. दत्ता वाकचौरे, गणेश गव्हाणे, सुखदेव फुलारी. (छाया : नामदेव शिंदे)

यावेळी नागेबाबा मंदिरात माजी मंत्री आ. शंकरराव गडाख यांनी दोन्ही खेळाडूंचा सत्कार करून समाधान व्यक्त केले. या स्पधेत बिहार, सेनादल, दिल्ली, गोवा, राजस्थान, तामिळनाडू, हिमाचल प्रदेश, केरळ, हरियाणा, कर्नाटक, उत्तरप्रदेश, मध्येप्रदेश, पंजाब व छत्तीसगड या संघाने बाद फेरी गाठली होती. महाराष्ट्राच्या संघाचे नेतृत्व अहमदनगर जिह्यातील भेंडा बुद्रुक येथील जिजामाता महाविद्यालयाचा खेळाडू कर्णधार शंकर गदाई या खेळाडूला प्रथमच संधी मिळाली, राहुल खाटिक (जिमामाता महाविद्यालय भेंडा), मयूर कदम (रायगड), असलम इनामदार (ठाणे), आकाश शिंदे (नाशिक), अरकम शेख (मुंबई उपनगर), शेखर तटकरे (रत्नागिरी), सिद्धेश पिंगळे (मुंबई शहर), अक्षय उगाडे (मुंबई शहर), किरण मगर (नांदेड), देवेंद्र कदम (धुळे), अक्षय भोईर (ठाणे) आदी खेळाडूचा समावेश होता. या खेळाडूंना प्रशिक्षक प्रशांत चव्हाण, संघव्यवस्थापक आयुब पठाण व फिटनेस कोच पुरुषोत्तम प्रभू यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रा. दत्ता वाकचौरे, गणेशराव गव्हाणे, डॉ. शिवाजी शिंदे, रविंद्र नवले, सुखदेव फुलारी, बाळासाहेब नवले, भाऊसाहेब गदाई, सोपान महापूर, राजेंद्र वाघडकर, बाबा गव्हाणे, रघू मोरकर आदी उपस्थीत होते.

Smart Shrirampur
Page No.3 July 28, 2022


36 वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा - 2022
NATIONAL GAMES
महाराष्ट्र पुरुष कबड्डी संघ
शंकर गदाई
मयूर कदम
अस्लम इनामदार
आकाश शिंदे
किरण मगर
अरकम शेख
पंकज मोहिते
राहुल खाटीक
अक्षय भोईर
सिद्धेश पिंगळे
अजिंक्य सुनील पवार
सचिन पाटील
प्रशिक्षक : प्रशांत चव्हाण, संघ व्यवस्थापक : आयुब पठाण

औरंगाबाद | सोलापूर | नागपूर | नाशिक | जळगाव | नांदेड | अकोला | सांगली | अहमदनगर पेपर प्रतिष्ठ

f SakalNews t @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 922580

सकाळ

सकाळ वृत्तसेवा रवींद्र सरोदे सूर्यवंशी कुकाणे

EDU करिअर

३

९

प्रो-कबड्डीतील सुपर चॅम्प



झोपडीत राहणाऱ्या, मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवीत शिक्षण घेता घेता खेळाची आवड जोपासण्याऱ्या भेंडयातील तरुणांनी कबड्डीत चमक आकाशाला गवसणी घातली. त्यांच्या जीवनसंघर्षाचा 'भेंडयाचे सुपर चॅम्प ऑफ कबड्डी' म्हणून लोक कौतुकाने उल्लेख करू लागले आहेत.


राहुल खाटीक


शंकर गदई


राहुल धनवडे

नेवासे तालुक्यातील भेंडयाच्या जिजामाता महाविद्यालयात ६१ व्या महाराष्ट्र राज्य कबड्डी स्पर्धेसाठी पुरुष गट संघनिवड शिबिर, जिजामाता महाविद्यालयाचा शंकर गदई महाराष्ट्राच्या कबड्डी संघाच्या कर्णधारपदी, जिजामाता महाविद्यालयाचा तीन विद्यार्थ्यांचा प्रो- कबड्डीमध्ये समावेश, हे सर्व पुन:पुन्हा ऐकल्याचा आनंद वाटतो ना? या आनंदामध्ये मात्र मोठी वेदनादायी कहाणी आहे. अनेक वर्षांची तपश्चर्या आहे. शिस्त, मेहनत आणि खडतर प्रवास केले, तर यश हमखास मिळते, याचे प्रत्यक्ष जिवंत पेन असले, पण तेवढा इतकी कहाणीही नव्हते, तेवढा मिळालेल्या यशाला आत्मपरीक्षणाचे महत्त्व असते. गरिबांच्या मुलांनी हे यश मिळविले, तेव्हा ते अधिक कौतुकास्पद होते. भेंडयातील झोपडपट्टीतील मुलांचा कहाणी वर्षांपूर्वी लिहायला ''मध्यमवर्गीय लिहीलेल्या'' या चित्रपटातील कथाकाराला ते. गरीब मुलांच्या पालक या चित्रपटाचा दुसरा अंक भेंडयात लिहिला गेला आहे. हे यश आहे तीन तालांचे. राहुल खाटीक प्रो-कबड्डीमध्ये या भेंडयाच्या तीन मुलांचा समावेश झाला. तालुक्यातील बोलती तालुका तीन संघांनी त्यांना विकत घेतले, हे यश साधे नाही. या मुलांची कहाणी लिहीण्या प्रेरणादायी आणि संघर्षाने भारलेली देखील आहे.

भेंडे हे एक छोटे खेडेगाव. गावचा आणि परीसराचा लोकनेते (स्व.) यशवंतराव मुळे पाटील प्रतिष्ठान सहकारी साखर कारखान्यामुळे कायमचाच झाला. गाव सहकार, बॅकिंग, कृषी, पाट बागायत, यामुळे विकसित होत लागले. व्यापारी, कारागीर आणि कष्टकरी एकवटले. याच सहकाऱ्यांच्या प्रतिनिधीने भेंडयाचे नाव जुन्नरेच भारतीय पातळीवर नेले. ही कहाणी आहे तीन कबड्डीपटूंची. शंकर गदई (तुलसाबाई जाईट संघाचा ३० लाख), राहुल धनवडे(केदुळकर कुलस्वामी संघाचा १० लाख), राहुल खाटीक (जयपूर पिंक पँथर संघाचा १० लाख) या तिघांची प्रो- कबड्डीमध्ये, हा राज अहमदाने हा भारतीय

संघामध्ये निवडला गेला. ही सर्व मुले गरीब पालकांत आहेत. रोजंदारीवर काम करून घर चालवणारे पिता. या मुलांचा अनेक वर्षांचा दिनक्रम सारखा आहे. अगदी निवड स्पर्धेच्या अगोदरही ही मुले रोजीरोज कामावर जात होती. भात, ऊसतोड जोखमपासून कबड्डी हे त्यांचे ध्येय होते.

या मुलांच्या खेळाला व्यापक अवकाश मिळाले ते श्री यशवंतराव मुळे या, शिक्षण संस्थेच्या जिजामाता संकुल व कला महाविद्यालयात. पदवी शिक्षणासाठी ही मुले महाविद्यालयात दाखल झाली. विद्यापीठीय शिक्षणाबरोबरच त्यांना एक गोष्ट मिळत गेली. ती यशवंतराव मुळे या. शिक्षण संस्थेच्या माजी आमदार नेहा मुळे पाटील आणि चंद्रलेखा मुळे पाटील यांनी जिजामाता महाविद्यालयाला भव्य इनडोअर स्टेडियम उभारले. विभागीय क्रीडासंकुल तयार केले. त्यामध्ये अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. गत-दहा वर्षांपूर्वी निर्माण केलेल्या या सर्वसुविधांमुळे आता चित्र बदलू लागले. ही मुले राष्ट्रीय स्पर्धक खाणकारी, स्पर्धापूर्व हाडहाड मुले, पूर्ण कबड्डीकडे आकृष्ट होऊ लागली. आजपर्यंत, कोच, खेळाडू एका वेळ लागले. राजकीय कारणामुळे सारणे होऊ लागले. या तीन तालांनी मिळविलेल्या उत्तुंग यशामुळे तालुकास्तर कबड्डीचे पेंढा हे हब होऊ शकते, असा विश्वास निर्माण झाला आहे.

शंकर, राहुल, राज ही गरीबघरची मुले. निवड झालेखेर शिबिरात आल्यावरही त्यांच्याकडे पैसे नव्हते. कपडे बदलण्यासाठी दुसरे नव्हते. या तालांतील ऊर्जा तालात पेढला नेहा मुळे पाटील आणि चंद्रलेखा मुळे पाटील यांनी या विद्यार्थ्यांना वेळोवेळी मदत केली, प्रेरणादान दिले. जिजामाता महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा. दत्ता काकडे यांनी खाटपाटे मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना घडविले. 'ज्ञानेश्वर'चे कार्यकारी संचालक अनिल लोखडे, प्राचार्य डॉ. रामकिसन सावंत यांनी पोषक वातावरण निर्माण केले. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचा परीणाम म्हणून आज प्रो- कबड्डीसाठी तिघांची निवड झाली आहे. या खेळाडूंनी उत्तरोत्तर प्रगती करत राहावे यास देशात उंचावावे, असाच मेहेकरांची इच्छा आहे.

(लेखक 'सकाळ'चे कुकाणे येथील वार्ताहर आहेत. मो. ९४२२९२७३१३)


जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, ज्ञानेश्वरनगर
महाविद्यालयाच्या खेळाडूंचे
हार्दिक अभिनंदन
३० लाख
१० लाख
१० लाख
शंकर गदई
१) महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई यांचा सर्वोत्कृष्ट कबड्डी खेळाडू पुरस्कार
२) राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र कबड्डी संघाच्या कर्णधारपदी निवड
३) राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत रौप्य पदक
४) प्रो कबड्डी पर्व नऊ यासाठी गुजराज जॉईंट संघात निवड
राहुल खाटीक
१) महाराष्ट्र कबड्डी संघात निवड आणि राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत रौप्य पदक
२) प्रो कबड्डी पर्व नऊ साठी बेंगलुरुबुल्स या संघात निवड
राहुल धनवडे
प्रो कबड्डी सर्व नऊ साठी जयपुर पिंक पँथर संघात निवड
महेश फुलमाळी
रोहतक हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी २० वर्ष वयोगट ७४ किलो वजनी गटांमध्ये महाराष्ट्र संघात निवड
शुभेच्छुक : प्राचार्य,उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद
तसेच सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी

ळाडूंना दुखापती : डॉ. पंडित



रोग तपासणी
न भेंडा बुद्रुक
महाविद्यालयात
ोते.
अॅक्युप्रेशर
वालिका नीलम
ेळाडूंशी चर्चा
करून त्यांच्या अडचणी आणि उद्भवणाऱ्या दुखापतींविषयी मार्गदर्शन केले

प्रा. डॉ. नारायण म्हस्के म्हणाले, खेळाडूंना क्रीडांगणावर बऱ्याच दुखापती होतात ते कुटल्याही उपाययोजना न करता खेळतात. त्यांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा मिळाल्या, तर ते निश्चित प्रगती करतील. प्राचार्य डॉ. आर. आर. सामवडे यांनी मनोगत व्यक्त केले.

शिबिरामध्ये एकूण ४३ जणांची तपासणी करून काहींना योग्य उपचार देण्यात आले. काही खेळाडूंच्या गंभीर दुखापतींविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

व्यासपीठावर भेंडा गावच्या सरपंच प्रा. उषा मिसाळ, प्राचार्य डॉ आर. आर. सामवडे, डॉ. लहानु मिसाळ, पत्रकार नामदेव शिंदे, प्रा. दत्ता वाकचौरे, प्रा. पांडुरंग देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रा. डॉ. शिरीष लांडगे, प्रा. डॉ. संभाजी काळे, विकास कसबे, प्रा. डॉ. संदेश भित्रे, प्रा. डॉ. मोहिनी साठे, प्रा. मृणाल भोसले, प्रा. विजय अडसुरे, प्रा. डॉ. अशोक सासडे, प्रा. डॉ. रामदास आर्ले, आदी उपस्थित होते.

शारीरिक शिक्षण संचालक प्रा. दत्ता वाकचौरे यांनी प्रास्तविक केले. प्रा. काकासाहेब लांडे यांनी आभार मानले.

जाहीर नोटीस

शेषतः कर्जत तालुक्यातील लोकांना तसेच पाटेवाडी, ता. कर्जत
ा या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पाटेवाडी,
शेतजमीन मिळकत सर्वे नं. १०४/१/१/२ पैकी क्षेत्र १ हे.
आर ०.१८ आर., एकूण क्षेत्र १ हे. २० आर., आकार ०.३०



स्पर्धात्मक वातावरणामुळे खेळाडूंच्या दुखापतीचे प्रमाण वाढले : डॉ. पंडित

नेवासा, (वार्ताहर) : श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय पंडित ॲक्सीडेंट हॉस्पिटल अहमदनगर यांच्या सौजन्याने शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित विनामूल्य अस्थिरोग तपासणी शिबिराचे आयोजन भेंडा बु. येथील जिजामाता महाविद्यालयात करण्यात आले होते

या शिबिरामध्ये खेळाडूंना क्रीडांगणावर दुखापती यावर उपाय आणि मार्गदर्शन करतांना डॉ राहुल पंडित म्हणाले खेळण्यापूर्वी शारीरिक व्यायाम करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर खेळाडूंनी अधिक क्रीडा कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रोटीन युक्त आहार घेणे गरजेचे आहे. यावेळी त्यांनी क्रीडांगणावर खेळाडूंना होणाऱ्या वेगवेगळ्या दुखापतीची माहिती दिली व त्या कशा टाळता येतील याबद्दलही मार्गदर्शन केले. तसेच खेळाडूंचा आहार कसा असावा? याविषयी सविस्तर विवेचन केले.

याप्रसंगी पंडित ॲक्सीडेंट हॉस्पिटलच्या संचालिका सौ. नीलम पंडित यांनी सर्व उपस्थित खेळाडूंची चर्चा करून त्यांच्या अडचणी आणि उद्भवणाऱ्या दुखापती याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात बोलतांना प्रा डॉ नारायण म्हस्के म्हणाले भागातील खेळाडूंना क्रीडांगणावर बऱ्याच दुखापती होतात ते कुठल्याही उपाययोजना न करता खेळत असतात त्यांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा मिळाल्या उपचार मिळाले तर ते निश्चित प्रगती करतील.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य-डॉ. आर. आर. सांवडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिबिरामध्ये भेंडा परिसरातील नागरिक,

पुण्य नगरी

जिजामाता महाविद्यालयात शिबिरास प्रतिसाद



भेंडा : खेळाडूंना क्रीडांगणावर बऱ्याच दुखापती होतात ते कुठल्याही उपाययोजना न करता खेळत असतात. त्यांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा मिळाल्या. तर ते निश्चित प्रगती करतील, अशी अपेक्षा प्रा. डॉ. नारायण म्हस्के यांनी व्यक्त केली.

श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या भेंडा बुद्रुक येथील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय पंडित एक्सीडेंट हॉस्पिटल, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाकडून आयोजित मोफत अस्थिरोग तपासणी शिबिर नुकतेच पार पडले.

खेळण्यापूर्वी शारीरिक व्यायाम करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर खेळाडूंनी अधिक क्रीडा कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रोटीन युक्त आहार घेणे गरजेचे आहे. क्रीडांगणावर खेळाडूंना होणाऱ्या वेगवेगळ्या दुखापतीची माहिती व त्या कशा टाळता येतील याबद्दल डॉ. राहुल पंडित यांनी शिबिरामध्ये मार्गदर्शन केले. तसेच पंडित एक्सीडेंट हॉस्पिटलच्या संचालिका नीलम पंडित यांनी देखीव खेळाडूंची चर्चा करून त्यांच्या अडचणीवर मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर.आर. सासवडे यांनी मनोगत व्यक्त केले.

शिबिरामध्ये भेंडा परिसरातील नागरिक, कारखान्यातील कर्मचारी, महाविद्यालयातील कर्मचारी, खेळाडू विद्यार्थी, विद्यार्थिनी अशा एकूण ४३ जणांची तपासणी करून उपचार देण्यात आले. तर काही खेळाडूंच्या गंभीर दुखापती विषयी मार्गदर्शन करून पुढील औषध उपचाराचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी भेंडा परिसरातील खेळाडू, पोलीस भरतीचा सराव करणारे व विविध खेळांचा सराव करणारे खेळाडू मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

व्यासपीठावर भेंडा गावच्या सरपंच प्रा. उषा मिसाळ, प्राचार्य डॉ. आर.आर. सासवडे, डॉ. लहानु मिसाळ, पत्रकार नामदेव शिंदे, प्रा. दत्ता वाकचौरे, प्रा. पांडुरंग देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास प्रा. डॉ. शिरिष लांडगे, प्रा. डॉ. संभाजी काळे, विकास कसबे, प्रा. डॉ. संदेश भित्रे, प्रा. डॉ. मोहिनी साठे, प्रा. मृणाल भोसले, प्रा. विजय अडसुरे, प्रा. डॉ. अशोक सागडे, प्रा. डॉ. रामदास आलें उपस्थित होते. प्रारंभी शारिरिक शिक्षण संचालक प्रा. दत्ता वाकचौरे यांनी प्रास्ताविक केले. तर प्रा. काकासाहेब लांडे यांनी आभार मानले.

भारतनामः
संपादक : विक्रम तलवार
Friday - 24 Feb 2023 - Page 3

स्पर्धात्मक वातावरणामुळे खेळाडूंच्या दुखापतीचे प्रमाण वाढले: डॉ. राहुल पंडित

भारतनामः
नेवासा फाटा (प्रतिनिधी)

श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या निजामाता ज्ञान व कला महाविद्यालय पंडित एक्सीडेंट हॉस्पिटल अहमदनगर यांच्या सौजन्याने शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित विनामूल्य अस्थिरोग तपासणी शिबिराचे आयोजन भेंडा बु ।। येथील निजामाता महाविद्यालयात करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये खेळाडूंना क्रीडांगणावर दुखापती यावर उपाय आणि मार्गदर्शन करताना डॉ राहुल पंडित म्हणाले खेळण्यापूर्वी शारीरिक व्यायाम करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर खेळाडूंनी अधिक क्रीडा कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रोटीन युक्त आहार घेणे गरजेचे आहे.



यावेळी त्यांनी क्रीडांगणावर खेळाडूंना होणाऱ्या वेगवेगळ्या दुखापतीची माहिती दिली व त्या कशा टाळता येतील याबद्दल ही मार्गदर्शन केले. तसेच खेळाडूंचा आहार कसा असावा याविषयी सविस्तर विवेचन केले.

याप्रसंगी पंडित एक्सीडेंट हॉस्पिटलच्या संचालिका सौ नीलम पंडित यांनी सर्व उपस्थित खेळाडूंची चर्चा करून त्यांच्या अडचणी आणि उद्भवणाऱ्या दुखापती याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात बोलताना प्रा डॉ नारायण म्हस्के म्हणाले, भागातील खेळाडूंना क्रीडांगणावर बऱ्याच दुखापती होतात ते कुठल्याही उपाययोजना न करता खेळत असतात. त्यांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा मिळाल्या उपचार मिळाले तर ते निश्चित प्रगती करतील .

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य – डॉ आर आर सामवडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिबिरामध्ये , भेंडा परिसरातील नागरिक, कारखान्यातील कर्मचारी, महाविद्यालयातील कर्मचारी, खेळाडू विद्यार्थी, विद्यार्थिनी अशा एकूण ४३ जणांची तपासणी करून काहींना योग्य उपचार देण्यात आले तर काही खेळाडूंच्या गंभीर दुखापती विषयी मार्गदर्शन करून पुढील औषध उपचाराचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी भेंडा परिसरातील व्यायाम करणारे खेळाडू, पोलीस भरतीचा सराव करणारे व विविध खेळांचा सराव करणारे खेळाडू मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. व्यासपिठावर भेंडा गावच्या सरपंच – प्रा उषा मिसाळ, प्राचार्य – डॉ आर आर सामवडे, डॉ लहानु मिसाळ, पत्रकार – नामदेव शिंदे , प्रा दत्ता वाकचौरे , प्रा पांडुरंग देशमुख ,आदी मान्यवर उपस्थीत होते .

कार्यक्रमास प्रा डॉ शिवाजी लांडगे, प्रा डॉ संभाजी काळे, विकास कमवे, प्रा डॉ संदेश भिवे, प्रा डॉ प्रा सौ मोहिनी साठे, प्रा सौ मृणाल भोसले, प्रा विजय अडसुरे, प्रा डॉ अशोक सानडे, प्रा डॉ रामदास आर्ले, आदी प्रमुख उपस्थीत होते शारीरिक शिक्षण संचालक – प्रा दत्ता वाकचौरे यांनी पाहुण्यांचे केले तर प्रा काकासाहेब लांडे यांनी आभार मानले.

सार्वमत

शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी व्यायाम व प्रोटीनयुक्त आहाराची गरज- डॉ. पंडित

भेंडा (वार्ताहर)- क्रीडा कौशल्य प्राप्त करण्यासाठी खेळाडूंनी शारिरिक व्यायामाबरोबर प्रोटीनयुक्त आहार घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. राहुल पंडित यांनी केले.

भेंडा येथील श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र-कला महाविद्यालय व पंडित ॲक्सीडेंट हॉस्पिटल अहमदनगर यांच्या सौजन्याने तसेच शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने खेळाडूंसाठी आयोजित विनामूल्य अस्थिरोग तपासणी



शिबिरात मार्गदर्शन मार्गदर्शन करताना डॉ. पंडित बोलत होते. शिक्षण संस्थेचे विश्वस्त डॉ. नारायण म्हस्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पंडित एक्सीडेंट हॉस्पिटलच्या संचालिका नीलम पंडित, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामकिसन सासवडे, सरपंच प्रा. उषा मिसाळ, डॉ. लहानु मिसाळ, पत्रकार नामदेव शिंदे, प्रा. दत्ता वाकचौरे, प्रा. पांडुरंग देशमुख व्यासपीठावर होते. शिबिरात ४३ जणांची तपासणी करून योग्य उपचार देण्यात आले. यावेळी डॉ. पंडित यांनी खेळाडूंना होणाऱ्या दुखापतीवरील उपाय याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रा. डॉ. शिरिष लांडगे, प्रा. डॉ. संभाजी काळे, प्रा. विकास कसबे, प्रा. डॉ. संदेश भित्रे, प्रा. डॉ. मोहिनी साठे, प्रा. मृणाल भोसले, प्रा. विजय अडसुरे, डॉ. अशोक सागडे, डॉ. रामदास आर्ले आदी उपस्थित होते. शारिरिक शिक्षण संचालक प्रा. दत्ता वाकचौरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. काकासाहेब लांडे यांनी आभार मानले.

Sarwamat Edition
Feb 25, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com

जीवनात अविचारी निर्णय घेऊ नका : निरीक्षक डोईफोडे



नेवासा, दि. १० (प्रतिनिधी) - शंभर किंवा नव्वद टक्के मार्क्स घेणारा प्रत्येक विद्यार्थी हा माझ्या दृष्टीने हुशार नाही. हुशार तोच विद्यार्थी आहे, जो आपल्या जीवनात आलेल्या प्रत्येक संकटांना तोंड देऊन आनंदाने जीवन जगतो तोच खरा हुशार, असे प्रतिपादन पोलिस निरीक्षक शिवाजीराव डोईफोडे यांनी केले.

तालुक्यातील भेंडे बुद्रुक येथील जिजामाता महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाने मुलींसाठी आयोजित केलेल्या विविध क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रामकिसन सासवडे होते. प्रा. डॉ. दत्ता वाकचौरे, प्रा. डॉ. संजय मेहर, नामदेव शिंदे, संतोष माताडे, प्रा. डॉ. मोहिनी साठे व्यासपीठावर उपस्थित होते.

जिजामाता महाविद्यालयात महिला दिन साजरा

पोलिस निरीक्षक डोईफोडे म्हणाले की, जीवनामध्ये स्वत:ला आधी सिद्ध करा. स्वतः निर्णय घेण्याइतपत कणखर, सक्षम झाले पाहिजे. मुलींनी जीवनात कधीही अविचारी निर्णय घेऊ नका. घटना घडत असतात, परंतु तुम्ही घटनेकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघा. आवडीचे क्षेत्र निवडून तुम्हाला भविष्यात काय व्हायचंय हे तुम्ही आत्ताच ठरवा. प्रास्ताविक प्रा. डॉ. दत्ता वाकचौरे यांनी केले.

प्रभात

भारतनामः

संपादक : रिषभ तलवार

Friday - 10 Mar 2023 - Page 2

जीवनात आलेल्या प्रत्येक संकटाशी लढा- पो. नि. डोईफोडे

भारतनामः
नेवासा (तालुका प्रतिनिधी)

आपण हुशार विद्यार्थी कोणाला समजतो शंभर टक्के, किंवा नव्वद टक्के मार्क्स घेणारा प्रत्येक विद्यार्थी हा माझ्या दृष्टीने हुशार नाही हुशार तोच विद्यार्थी आहे जो आपल्या जिवनामध्ये आलेल्या प्रत्येक संकटांना तोंड देऊन पुन्हा उभा राहतो आणी आनंदाने जिवन जगतो तोच खरा हुशार असे प्रतिपादन नेवासा पोलिस निरिक्षक शिवाजीराव डोईफोडे यांनी केले आहे.

नेवासा तालुक्यातील भेंडा बु येथील मारूतरावजी घुलेपाटिलशिक्षणसंस्थेच्याजिजामातामहाविद्यालयात जागतिक महिला दिना निमित्त शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाने मुलींसाठी आयोजित केलेल्या विविध क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन नेवासा पोलिस निरिक्षक – शिवाजीराव डोईफोडे.यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामकिसन सासवडे हे होते. प्रा डॉ.दत्ता वाकचौरे. प्रा डॉ संजय मेहर,पत्रकार – नामदेव शिंदे, संतोष माताडे प्रा डॉ मोहिनी साठे हे व्यासपीठावर उपस्थित होते.

पोलिस निरिक्षक डोईफोडे पुढे म्हणाले जिवनामध्ये स्वत : ला आधि सिध्द करा स्वत: निर्णय घेण्याइतपत कणखर झालं पाहिजे, सक्षम झालं पाहिजे. मुलींनी जिवनामध्ये कधी ही अविचारी निर्णय घेऊ नका घटना घडत असतात परंतु तुम्ही घटनेकडे सकारात्मक दृष्टीकोनातून बघा जे आपल्या नियंत्रनात आहे त्याचाच विचार करा जिवन म्हणजे मनाचा खेळ आहे तुम्ही जसा विचार कराल तसंच घडत राहते .स्पर्धेचे युग आहे काळा बरोबर चालायला शिका ज्यांनी काळ ओळखला ते आज उद्योगपती आहेत तुम्हाला भविष्यात काय व्हायचंय हे तुम्ही आत्ताच ठरवा तुमचे आवडीचे क्षेत्र निवडा त्यामध्ये सर्वतोपरी सखोल ज्ञान मिळवा आणी त्याचा उपयोग आपल्या करीअर करण्या साठी करा . कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. डॉ. दत्ता वाकचौरे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. मोहिनी साठे यांनी केले.



जीवनात आलेल्या प्रत्येक संकटाशी लढा : शिवाजी डोईफोडे

नेवासा : (स. गांवकरी)



आपण हुशार विद्यार्थी कोणाला समजतो शंभर टक्के, किंवा नव्वद टक्के मार्क्स घेणारा प्रत्येक विद्यार्थी हा माझ्या दृष्टीने हुशार नाही हुशार तोच विद्यार्थी आहे जो आपल्या जिवनामध्ये आलेल्या प्रत्येक संकटांना तोंड देऊन पुन्हा उभा राहतो आणी आनंदाने जिवन जगतो तोच खरा हुशार असे प्रतिपादन नेवासा पोलिस निरिक्षक शिवाजीराव डोईफोडे यांनी केले आहे .नेवासा तालुक्यातील भेंडा बु येथील मारुतरावजी घुले पाटिल शिक्षण संस्थेच्या जिजामाता महाविद्यालयात जागतिक महिला दिना निमित्त शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाने मुलींसाठी आयोजित केलेल्या विविध क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन नेवासा पोलिस निरिक्षक – शिवाजीराव डोईफोडे.यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामकिसन सासवडे हे होते. प्रा डॉ.दत्ता वाकचौरे. प्रा डॉ संजय मेहर,पत्रकार – नामदेव शिंदे, संतोष माताडे प्रा डॉ मोहिनी साठे हे व्यासपीठावर उपस्थित होते. पोलिस निरिक्षक डोईफोडे पुढे म्हणाले जिवनामध्ये स्वत : ला आधि सिध्द करा स्वतः निर्णय घेण्या इतपत कणखर झालं पाहिजे, सक्षम झालं पाहिजे. मुलींनी जिवनामध्ये कधी ही अविचारी निर्णय घेऊ नका घटना घडत असतात परंतु तुम्ही घटनेकडे सकारात्मक दृष्टीकोनातून बघा जे आपल्या नियंत्रनात आहे त्याचाच विचार करा जिवन म्हणजे मनाचा खेळ आहे तुम्ही जसा विचार कराल तसंच घडत राहते .स्पर्धेचे युग आहे काळा बरोबर चालायला शिका ज्यांनी काळ ओळखला ते आज उद्योगपती आहेत तुम्हाला भविष्यात काय व्हायचंय हे तुम्ही आत्ताच ठरवा तुमचे आवडीचे क्षेत्र निवडा त्यामध्ये सर्वतोपरी सखोल ज्ञान मिळवा आणी त्याचा उपयोग आपल्या करीअर करण्या साठी करा. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. डॉ. दत्ता वाकचौरे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. मोहिनी साठे यांनी केले.

सकाळ



भेंडे : जिजामाता महाविद्यालयात महिला दिनानिमित्त मार्गदर्शन करताना पोलिस निरीक्षक शिवाजी डोईफोडे. समवेत मान्यवर.
(छायाचित्र : रवींद्र सरोदे)

जीवन म्हणजे मनाचा खेळ : डोईफोडे

कुकाणे : जीवन म्हणजे मनाचा खेळ आहे. तुम्ही जसा विचार कराल तसंच घडत राहते. आज स्पर्धेचे युग असून काळाबरोबर चालायला शिका. ज्यांनी काळ ओळखला, ते आज उद्योगपती आहेत, असे प्रतिपादन पोलिस निरीक्षक शिवाजी डोईफोडे यांनी केले.भेंडे बुद्रुक येथील ज्ञानेश्वर कारखाना कार्यस्थळावरील मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाने मुलींसाठी आयोजित केलेल्या विविध क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रामकिसन सासवडे होते या वेळी प्रा डॉ. दत्ता वाकचौरे, प्रा. डॉ. संजय मेहर, पत्रकार नामदेव शिंदे, प्रा. डॉ. मोहिनी साठे आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. दत्ता वाकचौरे यांनी प्रास्ताविक तर प्रा. मोहिनी साठे यांनी आभार मानले.

सार्वमत

जीवनात निर्णय घेण्याइतपत कणखर बना- डोईफोडे

नेवासा (तालुका प्रतिनिधी)- जिवनामध्ये कधीही अविचारी निर्णय घेऊ नका. स्वतः निर्णय घेण्याइतपत स्वतःला कणखर बनवा, सक्षम व्हा, असे आवाहन नेवासा पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक शिवाजीराव डोईफोडे यांनी केले.

तालुक्यातील भेंडा येथील जिजामाता महाविद्यालयात जागतिक महिला दिना निमित्त मुलींसाठी आयोजित विविध क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन श्री. डोईफोडे यांच्याहस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. रामकिसन सासवडे अध्यक्षस्थानी होते. प्रा डॉ. दत्ता वाकचौरे. प्रा. डॉ. संजय मेहर, नामदेव जिंदे, संतोष माताडे, प्रा. डॉ. मोहिनी साठे व्यासपीठावर उपस्थित होते.

श्री. डोईफोडे म्हणाले, नव्वद टक्के, शंभर टक्के गुण घेणारा प्रत्येक विद्यार्थी हा माझ्यादृष्टीने हुशार नाही. विद्यार्थी आहे जो आपल्या जिवनामध्ये आलेल्या प्रत्येक संकटांना तोंड देऊन पुन्हा उभा राहतो आणी आनंदाने जीवन जगतो. प्रा. डॉ. दत्ता वाकचौरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मोहिनी साठे यांनी आभार मानले.





Sarwamat Edition